

आजचा दिनविशेष
१६४२ : ख्रिश्चन ह्युजेन्स या शास्त्रज्ञाने मंगळाच्या दक्षिण ध्रुवावर बर्फाचे ढिगारे शोधून काढले.

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर








कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार १३ ऑगस्ट २०२५ | अंक २३५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# बीडचा दिल्लीत डंका; खा.सोनवणेंच्या आक्रमक पावित्र्यामुळे सभागृह तहकूब



## केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर चर्चा करण्याची केली मागणी

बीड: सोमवारी मतचोरीच्या विषयावरून इंडिया आघाडीने निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला होता. यावेळी बीडचे खा.बजरंग सोनवणे आघाडीवर दिसले. दरम्यान, मंगळवारी सभागृहात याच विषयावर खा. बजरंग सोनवणे यांनी जोरदार आवाज उठवला. या विषयावर संसदेत आवाज उठवणारे खा.सोनवणे हे पहिले सदस्य ठरले. त्यांच्या समर्थनार्थ इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांनी घोषणाबाजी करत गदारोळ केला. अखेर, गोंधळ वाढल्याने लोकसभा अध्यक्षांना कामकाज बंद करून सभा तहकूब करावी लागली. इंडिया आघाडी, ज्यामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार, राजद, भाकप (माले), शिवसेना (उबाठा), तृणमूल काँग्रेस आणि इतर पक्षांचा समावेश आहे. यांनी बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष व्यापक पुनरावलोकनाला तीव्र विरोध दर्शविला आहे. आघाडीचे म्हणणे आहे की हा उपक्रम गरीब, वंचित, अल्पसंख्याक आणि स्थलांतरित लोकसंख्येतील लाखो मतदारांना मताधिकारापासून वंचित ठेवण्याचा गंभीर धोका निर्माण करतो. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ दरम्यान निवडणूक आयोगाच्या पक्षपाती आणि लहरी कारभारामुळे, मतदान सुरू होईपर्यंत मतदार याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करण्यात आला. या कारभाराचा थेट फायदा सत्ताधारी पक्षाला झाल्याचा आरोप खा. सोनवणे यांनी केला आहे. परिणामी, निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून देशभरात असंतोषाची लाट उसळली आहे. या असंतोषाच्या विरोधात कालपासून इंडिया आघाडीच्या ३०० पेक्षा अधिक खासदारांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत मोर्चा काढला. या मोर्चात खा.बजरंग सोनवणे यांनी ठळकपणे सर्वांचे लक्ष वेधले. संसद सभागृहाबाहेर जोरदार निदर्शने सुरू असतानाच आज सभागृहात या विषयावर खा.बजरंग सोनवणे यांनी जोरदारपणे आवाज उठवला. या विषयावर संसदेत आवाज उठवणारे खा.सोनवणे हे पहिले सदस्य ठरले. त्यांच्या समर्थनार्थ इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांनी घोषणाबाजी करत गदारोळ केला. अखेर, गोंधळ वाढल्याने लोकसभा अध्यक्षांना कामकाज बंद करून सभा तहकूब करावी लागली.

### देशभरातील खासदारांचा पाठींबा

देशभरातील खासदारांनी खा.बजरंग सोनवणे यांच्या मागणीला पाठींबा दिला. यामुळे दिल्लीत बीडच्या खासदाराचा डंका पहायला मिळाला. आजवर अशाप्रकारे आक्रमकबाणा दिल्लीच्या सभागृहात बीडचा दिसला नव्हता. खा.सोनवणे यांनी सबंध देशाला बीडचा आक्रमक बाणा दाखवून दिला.महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ दरम्यान, निवडणूक आयोगाच्या पक्षपाती व लहरी कारभारामुळे मतदान सुरू होईपर्यंत मतदार याद्यांमध्ये नावांची भरती करण्यात आली. याचा थेट सत्ताधारी पक्षाला फायदा झाला. यामु आयोगाच्या स्वायत्तेवर गंभिर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आज संसदेत या विषयावर सर्वप्रमथ मीच आवाज उठविला. माझ्या समर्थनार्थ इंडिया आघाडी उतरली. लोकशाहीच्या रक्षणासाठी माझा लढा सुरूच राहिले.

**-खा.बजरंग सोनवणे, बीड.**

# नागरिकत्वाचा पुरावा म्हणून आधार कार्ड स्वीकारता येणार नाहीफ- सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली – नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी आधार कार्ड निर्णायक पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही, अशी महत्त्वाची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेवरील याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले. सर्वोच्च न्यायालयाने भारतीय निवडणूक आयोगाच्या भूमिकेला दुजोरा देत, आधाराची स्वतंत्र पडताळणी आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. "आधार हा नागरिकत्वाचा निर्णायक पुरावा नाही, हे आयोगाचे म्हणणे योग्य आहे. पडताळणी करावी लागेल," असे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांना सांगितले. कपिल सिब्बल यांनी दावा केला की, एसआयआर प्रक्रियेमुळे अनेक मतदारांची नावे वगळली जातील, विशेषतः आवश्यक फॉर्म सादर करू न शकणाऱ्यांना फटका बसेल. त्यांनी सांगितले की, २००३ च्या मतदार यादीतील मतदारांनाही नवीन फॉर्म भरावे लागत आहेत, अन्यथा नावे वगळली जात आहेत. सिब्बल यांच्या मते, ७.२४ कोटी अर्जदारांपैकी मृत्यू किंवा स्थलांतराची



योग्य चौकशी न करता सुमारे ६५ लाख नावे वगळण्यात आली आहेत. मात्र, खंडपीठाने या आकड्याबाबत प्रश्न उपस्थित करत "ही भीती खरी आहे की काल्पनिक, हे समजून घेणे आवश्यक आहे," असे नमूद केले.

# आंघोळ करत असतानाना विजेचा धक्का लागून तरुणाचा दुर्दैवी अंत



अंबड तालुक्यातील गोरी येथील रहिवासी सतीश वसंत तिळवणे (वय ३५) या अविवाहित तरुणाचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला. सोमवारी सकाळी घरात आंघोळ करत असताना ही घटना घडली. सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सतीश आपल्या राहत्या घरातील बाथरूममध्ये आंघोळ करत होते. त्यावेळी बाथरूममधील बल्बच्या उघड्या तारेला त्यांचा स्पर्श झाला आणि त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. या धक्क्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे गोरी गंधारी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सतीश यांच्या पश्चात आई, वडील आणि लहान भाऊ असा परिवार आहे. गोदावरी नदीकाठी सोमवारी दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शिवसेना OBC VJNT तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब खेडकर यांची नियुक्ती



वंदनीय हिंदुरुदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा प्रतिनिधी तथा उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते मा. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार, शिवसेना सचिव मा. श्री. संजय मोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच शिवसेना OBC VJNT प्रवर्गाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आदरणीय बाळासाहेबजी किसवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधार, शिवसेना VJNT जिल्हाप्रमुख संजयबाबा लकडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख ॲड. नारायण शिंदे, शिवसेना गेवराई तालुकाप्रमुख उद्धव( बापू)मडके, गेवराई विधानसभा अध्यक्ष नवनाथ गवते, शहरप्रमुख मुकेश अण्णा महाजन युवा सेना तालुकाप्रमुख उमेश भैय्या शिंदे यांच्या उपस्थितीत मा. श्री. बाळासाहेब खेडकर यांची शिवसेना OBC VJNT प्रवर्गाच्या तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी त्यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

"शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून, जनतेच्या हक्कासाठी लढणारी एक चळवळ आहे" — अशा शब्दांत मान्यवरांनी नव्या तालुका अध्यक्षांचे अभिनंदन केले.

# विकासभू सरपंच नंदकुमार गोरे यांची जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती बिनविरोध निवड



पाटोदा (प्रतिनिधी) जनतेच्या मनात घर करून, शून्यातून विश्वनिर्माण करणारे नेते आणि विधानपरिषद सभापती राम शिंदे यांचे कट्टर समर्थक नंदकुमार (आबा) गोरे यांची जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती पदी बिनविरोध निवड झाली. या निवडीनंतर आपटी गावासह जामखेड तालुक्यात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.शेतकऱ्यांचा आधारस्तंभ गेल्या काही वर्षांत सरपंच म्हणून गावात रस्ते,पाणीपुरवठा,शाळा दुरुस्ती, स्वच्छता मोहीम, महिला बचत गट उभारणी अशा अनेक विकास कामांमध्ये गोरेंनी मोलाचा वाटा उचलला आहे. विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणे, पिकांना बाजारभाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, आणि कृषीक्षेत्रात नव्या योजना राबविणे यामुळे त्यांनी शेतकरी वर्गाचा विश्वास संपादन केला आहे.मला पाठिंबा देणाऱ्या संचालक मंडळाचे, ग्रामस्थांचे आणि सभापती साहेबांचे मी आभार मानतो. शेतकरी हितासाठी, पारदर्शक व्यवहारांसाठी आणि आधुनिक सुविधा निर्माण करण्यासाठी मी कायम प्रयत्नशील राहीन," अशी प्रतिक्रिया नंदकुमार (आबा) गोरे, उपसभापती, जामखेड कृषी उत्पन्न बाजार समिती. यांनी दिली गोरे यांच्या निवडीने जामखेड तालुक्यासह आपटी गावात ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. सोशल मीडियावरूनही मोठ्या प्रमाणात अभिनंदन संदेशांचा वर्षाव होत असून, विविध स्तरांतील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.



तळणेवाडी तालुका गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते मा श्री विक्रम राजे भोसले यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गेवराई तालुक्यातील शिवसेनेच्या कामावर विश्वास ठेवून त्यांनी आज गेवराई येथील शिवसेना कार्यालयात जाहीर प्रवेश केला यावेळी शिवसेना जिल्हा उप प्रमुख अँड नारायण शिंदे शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव बापू मडके शिवसेना विधानसभा प्रमुख नवनाथ जी गवते धर्मराज्य आहेर शिवसेना नेते शहराध्यक्ष मुकेश अण्णा महाजन युवा सेना विधानसभा अध्यक्ष उमेशजी शिंदे ओबीसी तालुका अध्यक्ष बाळासाहेब खेडकर राजाभाऊ तलवाडे बालाजी करांडे विजय पवार यांच्या उपस्थितीमध्ये प्रवेश करण्यात आला

# जिल्हा परिषदेच्या १६ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना कनिष्ठ सहाय्यक लिपिकपदी पदोन्नती

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्हा परिषदेच्या चतुर्थ श्रेणी गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना दोन नदीचे आदेश बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी ५ ऑगस्ट २०२५ रोजी दिले आहेत. कर्मचाऱ्यांच्या अनेक दिवसापासून पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. सदर पदोन्नती देण्यात आल्यामुळे कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याचे ऋण व्यक्त करून आनंद व्यक्त केला आहे. दरम्यान जिल्हा परिषदेचे सीईओ रहमान यांनी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती, बदली, आणि विविध प्रश्न सोडविण्यासाठी सकारात्मक काम सुरू असल्याचे दिसून आले आहे. जिल्हा परिषदेच्या पदोन्नती निवड समितीने पात्र १६ चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती



दिली आहे. खालील कर्मचाऱ्यांना पदोन्नती घेऊन पदस्थापना पुढील प्रमाणे दिली आहे. १) होनराव संजू शिवलिंग आप्पा शिक्षण विभाग, जि. प. बीड, २) बोबडे दत्तात्रय लक्ष्मण - आरोग्य विभाग, जि. प., बीड ३) गुजर श्रीकृष्ण जालिंदर - प्राथमिक आरोग्य केंद्र, विडा ४) गुंड बन्सी देविदास प्राथमिक आरोग्य केंद्र धर्मापुरी ५) श्रीमती जाधव सुरेखा रामदास- नवगण राजुरी ६) श्रीमती चांभारे सीमा विष्णू पंचायत समिती, माजलगाव ७) रंगदळ शरद माणिक- मा.शा. पात्रुड ८) श्रीमती सोनवणे सुनिता राजू बांधकाम विभाग क्र.२ ९) श्रीमती चाटे उषा महादेव - पंचायत समिती, केज १०) श्रीमती धुमाळ आशाबाई सिताराम- पंचायत समिती, परळी ११) कांबळे रामेश्वर श्रीपती - प्रा. आरोग्य केंद्र, पात्रुड १२) पाटील लक्ष्मीकांत पुरुषोत्तम गटशिक्षणाधिकारी पं.स. माजलगाव १३) जोशी संतोष हरिभाऊ- प्रा. आरोग्य केंद्र, आपेगाव१४) पुजारी रंजिता निवृत्तीराव- पं.स. परळी १५) जाधव गजानन देविदास - बालविकास प्रकल्प अधिकारी गेवराई १६) रोकडे महेश बाबुराव- शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड.बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या अध्यक्षतेखाली प्रदीप काकडे, उपमुख्य अधिकारी सामान्य प्रशासन प्रदीप काकडे, श्रीमती मेश्राम, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, आणि लेखा व वित्त अधिकारी जि. प. बीड यांच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीस मान्यता दिली. सदर पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहाय्यक प्रशासन अधिकारी नवले, कनिष्ठ प्रशासन अधिकारी संतोष गायकवाड, वरिष्ठ सहाय्यक श्रीमती स्वाती आम्ले यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बुधवार १३ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## मुलीच्या संसारात आईची दखल : एक आव्हान

पती-पत्नीच्या नात्यात येणारं आव्हान आणि त्यात माहेरच्या मंडळींचा, विशेषतः आईचा हस्तक्षेप, हा एक संवेदनशील आणि अनेक घरांमध्ये दिसून येणारा मुद्दा आहे. संसारातील वाढता हस्तक्षेप आणि त्याचे परिणाम आजकाल लग्न झालेल्या मुलींचा त्यांच्या माहेरच्या मंडळींशी, विशेषतः आईशी, सतत संपर्क असतो. मोबाईल फोनमुळे हे बोलणे दिवसभरात अनेकदा होते आणि अगदी छोट्या-मोठ्या गोष्टींवर चर्चा होते. यामुळे काहीवेळेस मुलीच्या नवीन संसारात, म्हणजेच पती, सासू आणि इतर सासरच्या सदस्यांशी तिचं नातं जुळायला अडचणी येतात. आईकडून मिळणाऱ्या शिकवणीमुळे किंवा सल्ल्यांमुळे मुलगी सासरच्या वातावरणात पूर्णपणे रुळू शकत नाही, अशी काही ठिकाणी समस्या दिसून येते. 'मुलीच्या संसारात आईची दखल' हा विषय सर्वश्रूत असताना सुध्दा बहुतांशी मुलींच्या माता आपली चुक मान्य करणार नाही हे देखील तेवढेच सत्य.

पती कामावर गेल्यानंतर किंवा घरी असेपर्यंतही मुलींचे फोनवर तासंतास बोलणे सुरू राहते. यामुळे पती-पत्नीमध्ये गैरसमज किंवा वादाची ठिणगी पडू शकते. अनेकदा मुली आपल्या संसारातील अगदी बारिक-सारीक गोष्टीही माहेरच्या मंडळींना सांगतात, जे काही प्रमाणात योग्य नसते. यामुळे माहेरच्या मंडळींना संसारात सतत हस्तक्षेप करण्याची संधी मिळते.

माहेरच्या लोकांच्या सततच्या हस्तक्षेपामुळे अनेकांच्या नात्यांमध्ये दुरावा निर्माण झाल्याचे किंवा नातेसंबंध तुटल्याचेही दिसून येते. समाजात शिक्षण वाढत असले तरी, कौटुंबिक समस्या कमी होण्याऐवजी वाढत आहेत, असे काही ठिकाणी निरीक्षण आहे. पती-पत्नीमधील वाद विकोपाला जाऊन ते चव्हाट्यावर येतात आणि यामुळे त्यांच्या मुलांवरही नकारात्मक परिणाम होतो, त्यांची ताटातूट होते.

न्यायालयांमध्ये पती-पत्नीच्या फारकतीची (घटस्फोटाची) प्रकरणे वाढत आहेत आणि यापैकी अनेक प्रकरणांमध्ये मुलीच्या आईचा किंवा माहेरच्या मंडळींचा संसारात असलेला हस्तक्षेप हे एक महत्त्वाचे कारण असल्याचे दिसून येते. न्यायालयानेही यापूर्वी अनेकवेळा अशा प्रकारच्या हस्तक्षेपाबद्दल ताकीद दिली आहे, तरीही ही समस्या कायम आहे. मुलींच्या संसारातील आईच्या अति-हस्तक्षेपामागे अनेक कारणे असू शकतात:

मुलीला लग्नानंतरही आपले मूल मानणे आणि तिच्याबद्दलची ओढ यामुळे आई सतत संपर्कात राहते. काही मातांना मुलगी नवीन वातावरणात कशी रुळेल याची चिंता असते आणि त्यातून त्या जास्त लक्ष घालतात. आईला वाटते की ती आपल्या मुलीला योग्य सल्ले देत आहे, ज्यामुळे तिचे भले होईल. मुलीला नवीन जबाबदाऱ्या आणि नातेसंबंधांशी जुळवून घेण्यासाठी मदत करण्याचा प्रयत्न म्हणून आई हस्तक्षेप करू शकते. पती-पत्नीमध्ये किंवा मुलगी आणि सासरच्या लोकांमध्ये योग्य संप्रेषणाचा अभाव असल्यास मुलगी माहेरच्या लोकांकडून जास्त सल्ला घेते. या समस्येवर उपाय शोधण्यासाठी काही गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे,

मुलीने स्वतः जबाबदारी घेणे. लग्नानंतर मुलीने आपल्या नवीन संसाराला प्राधान्य देणे आणि सासरच्या मंडळींशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. पती आणि पत्नीने एकमेकांशी मोकळेपणाने संवाद साधणे आवश्यक आहे. तसेच, मुलीने सासरच्या मंडळींशीही चांगला संवाद साधायला हवा. माहेरच्या मंडळींशी किती संपर्क साधायचा आणि कोणत्या गोष्टी त्यांच्यासोबत शेअर करायच्या, यासाठी स्वतःच काही सीमा निश्चित करणे महत्त्वाचे आहे.

मुलीच्या आईनेही आपल्या मुलीला नवीन संसारात रुळण्यासाठी आणि स्वतःचे निर्णय घेण्यासाठी स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. तिचा संसार सुखाचा व्हावा अशी तिची इच्छा असेल तर तिने हस्तक्षेप टाळावा.

एकंदरीत, लग्न हे दोन व्यक्तींसोबतच दोन कुटुंबांना जोडणारे नाते असते. या नात्यात संतुलन राखणे आणि एकमेकांच्या स्पेसचा आदर करणे हे सुखी संसारासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**राजेंद्र चौधरी**
**रोझोदा. ता. रावेर. जि. जळगाव**
**मो. ७७००९८२७६५**

# गेवराईचे पाटील शिवराज पवार जनतेच्या मनातील ध्रुवतारा

गेवराई, बीड जिल्ह्याच्या हृदयात वसलेलं एक शहर, जिथे मातीशी नाळ जोडलेलं एक नाव सतत चर्चेत असतं – शिवराज बाळराजे पवार! "गेवराई ही माझी आई आहे, तिची देखभाल माझं प्रथम कर्तव्य आहे," असं ठामपणे सांगणारा हा तरुण नेता केवळ राजकारणातच नव्हे, तर जनतेच्या मनातही आपलं अढळ स्थान निर्माण करतोय. माजी आमदार लक्ष्मण पवार यांचा राजकीय वारसा आणि बाळराजे पवार व गीताभाभी पवार यांचे संस्कार यांच्या संगमातून घडलेला हा हीरा आज गेवराईच्या तरुणाईचा ध्रुवतारा बनलाय. आज या तरुण नेता शिवराज पवार यांचा वाढदिवसा आहे त्या निमित्त त्यांना मनपूर्वक शुभेच्छा शिवराज पवार यांचे प्रेरणादायी जीवन प्रवासाचा, बाळराजे गीताभाभींच्या कष्टमय संस्कारांचा आणि त्यांच्या नेतृत्वाचा गौरव म्हणजे गेवराईच्या मातीतून उभं राहिलेलं हे नव नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात अभूतपूर्व ठरेल. "संघर्षातून माणूस घडतो, पण संस्कारातून तो महान बनतो," असं डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. शिवराज पवार यांच्या जीवनाचा पाया हा त्यांच्या आई, गीताभाभी पवार यांच्या कष्टमय आणि मूल्यनिष्ठ जीवनाने घडलाय. गीताभाभी, एक मायेची सावली, ज्यांनी बाळराजे पवार यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून गेवराईच्या जनतेची सेवा केली. त्यांनी शिवराज यांना लहानपणापासूनच प्रेम, करुणा आणि कर्तव्याची शिकवण दिली. "लोकांचं दुखणं समजून घ्या, त्यांना आधार द्या," असं सांगणाऱ्या बाळराजे व गीताभाभींनी शिवराज यांना केवळ एक नेता नव्हे, तर जनतेचा मित्र बनवलं. त्यांच्या संस्कारांमुळे शिवराज यांचं मन सतत लोककल्याणासाठी धडपडतं. बाळराजे दादा गीताभाभींच्या या कष्टाचा आणि त्यांच्या प्रेमाचा ठसा शिवराज यांच्या प्रत्येक कृतीत दिसतो, ज्यामुळे ते गेवराईच्या प्रत्येक घरात "आपला माणूस" म्हणून ओळखले जातात. कर्तव्य हीच खरी पूजा



आहे," असं संत तुकाराम महाराज म्हणाले. शिवराज पवार यांनी या उक्तीला आपल्या कृतीतून सार्थ ठरवलं. लहान असो वा मोठा, प्रत्येकाला आपुलकीने विचारपूस करणारा हा तरुण नेता नेहमीच जनतेच्या सुख-दु:खात सहभागी होतो. गावखेड्यापासून तांड्यावस्तीपर्यंत, शिवराज यांनी कार्यकर्त्यांपेक्षा मित्र बनण्याचा मार्ग निवडला. त्यांचा हा साधेपणा आणि प्रामाणिकपणा यामुळेच तरुणाई त्यांच्याकडे आकर्षित होते. "माझी ताकद माझी जनता आहे," असं शिवराज पवार ठामपणे सांगतात, आणि त्यांच्या या वाक्याला छत्रपती शिवाजी महाराजांचा "प्रजेच्या हितासाठी राजा आहे" हा विचार पूरक ठरतो. माजी.आ.लक्ष्मण पवार यांच्या आजारपणात शिवराज यांनी तालुक्याच्या विकासाची धुरा खांद्यावर घेतली. त्यांनी मंजूर करून घेतलेली मोठी विकासकामं – रस्ते, आणि पायाभूत सुविधा – आजही गेवराईच्या प्रगतीची साक्ष देतात. विधानसभा निवडणुकीत त्यांनी प्रचारयंत्रणा स्वत: हाताळली, आणि कमी वयातच त्यांनी राजकीय परिपक्वता दाखवली. "कृतीशिवाय स्वप्नं फक्त स्वप्नंच राहतात," असं पंडित नेहरू यांनी म्हटलं होतं. शिवराज यांनी ही स्वप्नं प्रत्यक्षात उतरली, आणि गेवराईच्या विकासाला नवी दिशा दिली सत्तेच्या मागे धावणं सोपं आहे, पण सत्तेचा उपयोग जनकल्याणासाठी करणं हे खऱ्या नेत्याचं लक्षण. शिवराज पवार यांनी सत्तेच्या काळातही संयम आणि साधेपणा जपला. त्यांच्यावर बाळराजे आणि गीताभाभींच्या संस्कारांचा प्रभाव इतका खोल आहे की, सत्तेची हवा त्यांच्या डोक्यात कधीच गेली नाही. "जो आपल्या मातीत रुजलेला आहे, तो कधीच उन्मत्त होत नाही," असं अल्लामा इकबाल यांनी म्हटलं होतं. शिवराज यांनी या विचाराला साजेसं जीवन जगलं. सत्तेचा वापर त्यांनी केवळ आणि केवळ जनतेच्या भल्यासाठी केला, आणि यामुळेच त्यांचा चाहतावर्ग वाढत गेला. शिवराज पवार यांनी गेवराईच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिलं. स्वच्छता, पाणी, रस्ते, आणि वीज या मूलभूत सुविधा गेवराईच्या विकासासाठी आवश्यक आहेत. मात्र, सध्याच्या प्रशासकीय व्यवस्थेत या सुविधा पुन्हा अडचणीत आल्या आहेत. यासाठी शिवराज यांनी आता अधिक आक्रमकपणे पुढे येण्याची गरज आहे. त्यांनी बाळराजे पवार यांचं स्वच्छ, समृद्ध आणि सुसंस्कृत गेवराईचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला जागं करावं. यासाठी त्यांनी जनतेला सोबत घेऊन स्वच्छता मोहिमांना प्रोत्साहन द्यावं, आणि स्थानिक स्वराज्य संस्थांवर दबाव आणून मूलभूत सुविधांचं जाळं मजबूत करावं. शिवराज पवार यांनी येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीत आपली लोकप्रियता आणि गेल्या दहा वर्षांतील कामाचा डोंगर पणाला लावावा. त्यांनी लक्ष्मण पवार आणि बाळराजे पवार यांच्या कार्यकर्त्यांशी संवाद वाढवावा, आणि नव्या पिढीतील कार्यकर्त्यांना प्रोत्साहन द्यावं. गावागावात जनसंवाद संपर्क यात्रा काढून त्यांनी जनतेच्या समस्या थेट ऐकाव्यात. तसंच, सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून तरुणाईला जोडणं आणि त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्याचं आश्वासन देणं महत्त्वाचं आहे. "न्याय देणारा नेता हाच खरा पाटील," असं छत्रपती शिवाजी महाराजांचं तत्त्व त्यांनी अंगीकारावं आणि कोणत्याही परिस्थितीत अन्यायाला थारा देऊ नये. शिवराज पवार यांचं जीवन हे संघर्ष आणि समर्पणाची गाथा आहे. गीताभाभींच्या कष्टांनी आणि बाळराजे पवार यांच्या मार्गदर्शनाने घडलेला हा नेता आज गेवराईच्या प्रत्येक घरात आदराने नाव घेतला जातो. सुख असो वा दु:ख, शिवराज नेहमीच जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. त्यांचा प्रेमळ, मायाळू आणि दयाळू स्वभाव गेवराईच्या मातीत रुजलाय. "जिथे प्रेम आहे, तिथे जीवन आहे," असं अल्लामा इकबाल यांनी म्हटलं. शिवराज यांनी आपल्या प्रेमळ स्वभावाने गेवराईच्या जनतेचं मन जिंकलं आहे. शिवराज बाळराजे पवार हे केवळ गेवराईचे पाटील नाहीत, तर तरुणाईचं प्रेरणास्थान, जनतेचा मित्र आणि विकासाचा ध्यास घेतलेला खरा नेता आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा लेख त्यांच्या कष्टांना, गीताभाभींच्या संस्कारांना आणि बाळराजे पवार यांच्या स्वप्नांना समर्पित आहे. येणाऱ्या काळात शिवराज पवार गेवराईला नव्या उंचीवर नेऊन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत तुकाराम महाराज, पंडित नेहरू, छ. शिवाजी महाराज आणि अल्लामा इकबाल यांच्या विचारांना साजेसं नेतृत्व घडवतील, यात शंका नाही. गेवराईच्या मातीतून उभं राहिलेलं हे नेतृत्व एक दिवस महाराष्ट्राच्या राजकारणात इतिहास घडवेल!

**लेखक**
**जुनेद बागवान गेवराई**
**मो.9730075313**

## एस आय टी समितीच्या कारवाईच्या भीतीपोटी शासनावर दबाव टाकण्यासाठी बेकादेशीर पुणे येथील आंदोलनामध्ये सहभागी शिक्षण विस्तार अधिकाऱ्यावरती कारवाई करण्याची मागणी– इंजिनिअर सादिक इनामदार

बीड प्रतिनिधी बीड जिल्हा खाजगी शिक्षक भरती घोटाळा संदर्भामध्ये शासनाकडून एसआयटी समितीची स्थापना करण्यात आली आहे व जमिनी भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कारवाई करणे अटक होणार असल्याच्या भीती होती शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी आखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपात्रित अधिकारी संघ, सामूहिक बेमुदत रजा आंदोलन शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे येथे उपस्थित राहणारे बीड जिल्ह्यातील शिक्षण विस्तार अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या परवानगीने घेतली नसल्यामुळे व मुख्यालय सोडून जाता येत नसताना सुद्धा बेकायदेशीर आंदोलनामध्ये सहभाग नोंदवल्यामुळे यांचे वरती शिस्ताभंगाची किंवा निलंबनाची कार्यवाही करण्याची मागणी सादिक इनामदार यांनी केली आहे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 12



महाराष्ट्र शासनाने खाजगी संस्था शिक्षक भरती घोटाळा, शालार्थ आय डी घोटाळा इत्यादी बाबी करिता special investigation team (SIT) नेमलेली आहे. त्यानुषंगाने SIT पथकने सदरील चौकशी सुरु केलेली आहे. शासनाकडून नियुक्त केलेल्या पथकावर दबाव आणण्याच्या दृष्टीने आखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपात्रित अधिकारी संघ यांनी पुणे येथे दि 08-08-2025 पासून सामूहिक बेमुदत रजा आंदोलन सुरु केलेले आहे. जे कीं बेकायदेशीर आहे. विशेष बाब म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधीपत्याखालील वर्ग 3 चे जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी सदरील रजा आंदोलनास पाठिंबा देऊन आंदोलन स्थळी उपस्थिती दर्शविली आहे. जे कीं नियमबाह्य असून आपली कोणतीही पूर्व परवानगी न घेता संबंधित जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी बोदार्ड धनंजय मारोतीराव,सोनवणे भगवान सोपानराव,राऊत रंगनाथ नामदेव, कनाके श्रीराम मारोती,शिंदे धनंजय रामराव,शेळके ऋषिकेश जनार्धनराव,काकडे मोहन त्रिंबक गव्हाणे हनुमंत गहिनीनाथ,शिंदे प्रशांत विष्णुपंत,नांदुरकर भिमराव किसनराव,महामुनी रविंद्र विठ्ठलराव सुवर्णकार मधुकर शामराव,केंद्र सुनील श्रीपतराव,बेडसकर लक्ष्मण बापुराव,हजारे नानाभाऊ गणपती माटे सिध्देश्वर बापुराव,शेख जमीर जहुरुद्दीन,दत्तात्रय चाटे,राजेश खटावकर,ढाकणे राजेंद्र,तुरुकमारे मिलिंद,बाबासाहेब उजगरे,समंदर खान पठाण,गणेश गिरी यांनी बीड मुख्यालय सोडलेले आहे. तसेच महाराष्ट जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 12 मधील तरतुदीनुसार सार्व जनिक निदर्शने किंवा इतर कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे परवानगीशिवाय उपस्थिती लावलेली आहे. वरील बाबींचे अवलोकन केले असता त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 12 चा भंग केलेला आहे. त्यानुषंगाने संबंधितावर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम 3 नुसार तात्काळ निलंबित करून संबंधितविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करावी या प्रकरणांमध्ये दोषी असणाऱ्या अधिकारी वरती मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जितीन रहेमान यांनी तात्काळ कारवाई न केल्यास उच्च न्यायालय खंडपीठ येथे दाद मागणार आहे असे इंजिनिअर सादिक इनामदार यांनी म्हटले आहे

# सण उत्सव शांततेत साजरे करा : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे : पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद व दहीहंडी हे सण येत्या काळात एकत्रित येत आहेत.जिल्ह्यात हे सण साजरे करतांना सर्व धर्मियांनी एकमेकात परस्पर सौहार्द व शांतता ठेवून साजरे करावेत. पर्यावरण संरक्षणासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आज शांतता समितीची बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. उत्सव काळात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. पोलीस प्रशासन नेहमी दक्ष असून नागरिकांनी योग्य माहिती द्यावी. उत्सव काळात येणाऱ्या अडचणी तात्काळ सोडविण्यावर भर दिला जाईल.कोणत्याही नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये.उत्सव काळात गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी प्रशासनाच्यावतीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.यासाठी चांगले नियोजन केले असून नागरिकांना कोणतीही अडचण होणार नाही याची काळजी प्रशानाकडून घेण्यात येत असल्याचे जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले. शांतता समितीच्या सदस्यांनी गणेशोत्सव, दहीहंडी व ईद ए मिलाद या सणामध्ये येणाऱ्या अडचणी मांडल्या. त्या निवारण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाच्यावतीने सांगितले. सण उत्सवाच्या काळात शांतता समितीचे सदस्य, सर्व सामाजिक नेत्यांनी आपापल्या गावात, नगरात शांतता राहील यासाठी स्वतः प्रयत्न करावे.तसेच प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.बैठकीस मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यासह शांतता समितीचे सदस्य व इतर सदस्यांची उपस्थिती होती.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १३ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## ग्रंथपाल दिनाच्या निमित्ताने

आज पुन्हा 12 ऑगस्ट.... ग्रंथपाल दिन... लायब्ररी सायन्सचे जनक श्री शियाली रंगनाथन यांची जयंती म्हणुन तो दिवस ग्रंथपाल दिन म्हणुन साजरा होतो.... ज्ञानाने ओत प्रोत समृद्ध असणारे ग्रंथ संग्रह करणारे आणि त्याची देवघेव करणारे दालन म्हणजे ग्रंथालय आणि त्या ग्रंथालयचे सर्वेसर्वा बनून नोकरी स्वरूपात औपचारिक प्रतिनिधित्व करणारी मंडळी म्हणजे ग्रंथपाल अशी समजूतीपुरती व्याख्या केली तर तशी योग्यच ठरेल. मी बी एस सी केमेस्ट्री अशी पदवीधर म्हणुन पदवी घेतल्यानंतर लिखाणाच्या आवडीमुळे मी हे प्रोफेशन निवडल. दोन हजार दोन साली बी लिब म्हणजेच बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स फर्स्ट क्लास आणि वर्गात दुसरी तर मुलींमध्ये पहिली अशी उत्तीर्ण झाले आणि लकिली त्याच वर्षी महाविद्यालयाला एम लिब म्हणजेच लायब्ररी सायन्सची मास्टर डिग्री कोर्स सुरु करण्याची परवानगी मिळाली... जणू काही मी ते शिक्षण घ्याव म्हणूनच ते सगळ जुळून आल होत. थोडी फी जास्त होती.. म्हणजे बाविस वर्षांपूर्वी... त्यावेळी असणारी रुपये 18 हजार फी आता तितकीशी जास्त वाटत नाही. विकासनशील भारतात होणाऱ्या नवीन घडामोडी आणि त्यातून सुधारलेली अर्थव्यवस्था आणि त्याही पुढे स्वावलंबी असल्याने आज ती फी तेव्हा वाटायची तेवढी जास्त वाटत नाही. अवघड अभ्यास तरी वर्षभर सर्व परीक्षा, asignment मध्ये अव्वल होते मी पण ऐन मुख्य परीक्षे आधी वडील स्वर्गवासी झाले आणि सगळ संपल्या सारखच झालेल पण गुरुजनांनी आत्मविश्वास वाढवला म्हणुन परीक्षा दिली आणि चक्क first class with university पहिल्या पाच नावात rankar म्हणुन झळकले.... निकाल लागण्या आधीच एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत assisrant librarian (उप ग्रंथपाल) म्हणुन लायब्ररी प्रोफेशनल करियरची जी सुरवात झाली ती पुढे librariyan म्हणुन अजूनही मार्गस्थ होऊन आजही विदयापीठ ग्रंथालय कर्मचारी म्हणुन सुरु आहे. आधीपासूनच नोकरी म्हणजे फक्त पाट्या टाकणे किंवा समोर आले तेवढे फक्त काम करणे हे रुचलेच नाही. त्यामुळे तिथेच innovative services चा श्रीगणेशा झाला... त्यावर्षी असणाऱ्या कुंभमेळ्याच्या आलेल्या सर्व वर्तमान पत्रातील बातम्यांची कात्रण साठवून छान वाचणाऱ्याला समजेल असे वर्गीकरण करून न्यूजपेपर क्लीपिंग प्रोजेक्ट स्वतः नोकरीची सगळी जबाबदारी सांभाळून केला. ती लायब्ररी कायम वाचकांनी खूप गजबजलेली असायची म्हणजे fuctional किंवा most utilised अस म्हणता येईल. विद्यार्थी हुशार होते निरनिराळ्या स्पर्धेत भाग घ्यायचे त्यात त्यांना प्रोजेक्ट बनवायचे असायचे मग त्यासाठी त्यांना निरनिराळे संदर्भ ग्रंथ कसे कुठे उपलब्ध होतील आणि त्याचा वापर करून प्रोजेक्ट कॉन्टेन्ट strong बनवायला मदत केली. खास त्यासाठी त्यांना एकदा नाशिकच्या मुक्त विद्यापीठ ग्रंथालयात घेऊन गेले होते काही encyclopedia मधून माहिती मिळविण्यासाठी आणि ती प्रोजेक्ट मध्ये लिखाणात संदर्भीय माहिती म्हणुन वापरण्यासाठी नंतर एका management ग्रंथालयात रुजू झाले कारण तशी मनोकामना ठेवूनच पदव्युत्तर शिक्षण घेतले होते. त्यांच्या admission process मध्ये मार्केटिंग टीम सोबत उत्तम यशस्वी मार्केटिंग केली. खरतर ते calibar माझ्यात आहे हे मला तेव्हा समजले. मग डेंटल लायब्ररीत रुजू झाले तिकडे त्यांच्या डेंटिस्ट्री साठी असणाऱ्या masters degree चे ग्रंथालय त्यांच्या norms प्रमाणे अद्ययावत करण्याचे यशस्वी प्रयत्न केले म्हणजे collection development साठी rare books प्रति मिळविणे, लाख रुपयांचे जर्नल, मॅगझीन order करणे... स्वतः दिल्लीला पुस्तक खरेदीसाठी जाणे तब्बल rs. 43 लाख अवघ्या सहा महिन्यात त्या ग्रंथालयच्या पुस्तक खरेदीसाठी खर्च केला होता. अजूनही आठवते rs. 25 हजाराचे एक पुस्तक तेव्हा त्या ग्रंथालयातले आणि मी स्वतःपाहिलेले सर्वात महाग पुस्तक होते. ग्रंथालयाचे स्वरूप बदलले ते बघेपर्यंत लग्न होऊन सासरी जायचे म्हणुन नोकरी सोडायला लागली. मग सासरी आले ते मुंबईला... अस वाटलेल कि एवढ्या मोठ्या शहरात कशी मिळणार नोकरी.... पण एकंदरीत ग्रंथालयच्या आणि ज्या ग्रंथालयात काम करत होते त्या शैक्षणिक संस्थांच्या विकासात खारू ताईचा वाटा माझ्या वाटेला येणारा होताच. त्यामुळेच इंजिनीअरिंगच्या ग्रंथालयात होते तेव्हा लायब्ररी साठी काही ऍक्टिव्हिटीला परवानगी नाही मिळाली तरी त्यांच्या iso सर्टिफिकेशन साठी आणि त्यांनी केलेल्या राष्ट्रीय परिषदेसाठी ग्रंथालय सेवे व्यतिरिक्त सक्रिय योगदान दिले. नंतर मीडिया कॉलेजला तब्बल आठ वर्ष होते तिकडे जवळपास दर दोन महिन्यात लायब्ररी साठी काही तरी ऍक्टिव्हिटी आयोजन करायचे मग त्यात विविध स्पर्धा, लेखकांच्या भेटी, पुस्तक प्रदर्शन, ग्रंथालय चमूसाठी राष्ट्रीय परिषद, कार्यशाळा, विविध ग्रंथालयाचे मेम्बर होऊन त्यांच्या होणाऱ्या आयोजनात संस्थेतून सहभाग करणे.. किंवा बाहेरील ग्रंथालयाशी संलग्न होऊन एकत्रित चर्चासत्र वैगरे असे अनेक आयोजन करून कधी तरी बुकमार्क बनविणे तर कधी book review writing असे नानाविध संस्थेतील शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांना ग्रंथालय आवड निर्माण करण्याच्या सर्वतोपरी प्रयत्न केला. अलीकडे विद्यापीठ ग्रंथालयात कर्मचारी म्हणुन कार्यरत असताना स्वतः काही initiate करण्याची authority नसली तरी करणाऱ्या आयोजनात काय उपयुक्त असेल हे आधीच्या अनुभवातून अचूक सांगता येते. विद्यापीठ ग्रंथालयीन सेवेचे स्वरूप थोडे अत्याधिक असते त्यातही जे आपल्या वाट्याला आले ते उत्तम करण्याचा प्रयत्न असतो. हे सगळ स्वानुभव कथन करण्याचा हेतू हाच कि ग्रंथालय हे बहुतांश दुय्यम स्थानी मानले जाते. आणि ग्रंथालयालाच दुय्यम स्थान असेल तर ग्रंथपालांना काय वेगळे असणार??? ही परिस्थिती बदलण्याचे स्व प्रयत्न प्रत्येकानी केले तर नक्कीच अवघड नाही. कारण संगणकाचा वाढता वापर याच्या साहाय्याने ग्रंथालय स्वरूप खूप बदलले आहे आणि artificial intelligence म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता याचाही वापर करून अद्ययावत सुविधा मधून qualitative collection आणि hi quality services दोन्हीची उत्तम सांगड घालणे सहजच शक्य आहे.

**हिरकणी गीतांजली वाणी**
**साहित्यिक/ग्रंथपाल**

# प्रभारी अधिकारी राजेश गडवे हे वाळूमाफिया व अवैध धंदयासाठी ठरत आहेत कर्दनकाळ

## प्रभारी अधिकारी राजेश गडवे यांचा वाळू माफियांना चौथा दणका: चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गायकवाडजवळगाव येथील नदीतून वाळू चोरी करणारा ट्रॅक्टर पकडला

चकलंब प्रतिनिधी ! असलम सय्यद दि .१० सपोनि राजशे गडवे व त्यांचे सहकारी उमापुर हद्दीत गस्त घालत असतांना मौजे गायकवाड जळगाव येथील नदीतून वेळ17.00 वा वाळू भरून टॅक्टर जळगाव फाटयाकडे जात असल्याची माहिती मिळताच प्रभारी सपोनि राजेश गडवे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसोबत वाळूच्या टॅक्टर चा पाठलाग करून ट्रॅक्टर पकडला . यामध्ये सपोनि राजेश गडवे त्यांचे सहकारी पोउपनि पानपाटील साहेब , चालक सुरवसे, पोअं घोंगडे, पोह घनशाम केदार यांनी मोठी कारवाई केली , या कारवाईत विनापरवाना वाळू वाहतूक करणारा टॅक्टर पकडून , पोह घनशाम केदार यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम 303(2) नुसार गुन्हा दाखल करून, टॅक्टर वर गुन्हा दाखल करून आकरा लाख नव्वद हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.सपोनि गडवे यांच्या



आदेशाने पुढील तपासासाठी एन .पी. सी गुजर यांच्याकडे देण्यात आला आहे . वाळू माफियांना गडवे यांनी चौथा दणका दिला आहे .

गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून एपीआय राजेश गडवे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार घेतच दोन नंबर वाल्यांना दणका दिला आहे,एक पाठोपाठ धडक चार कारवाया करत अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याने तालुक्यात या कारवाईचे कौतुक होत आहे.पदभार घेतच धडक कारवाईला सुरुवात करून राजेश गडवे यांनी आपल्या कार्याची तत्परता दाखवून दिली.

दिनांक 10 रोजी उपविभागीय पेट्रोलिंग दरम्यान गायकवाड जळगाव या गावात अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर दिसताच पोलिसांनी जळगाव येथील सरकारी दवाखान्याजवळ टॅक्टर पकडला यावेळी सपोनि गडवे आणि त्यांचे सहकारी व गावातील दोन पंच यांच्या समक्ष स्पॉट पंचनामा करत ट्रॅक्टर जप्त केले.ही कार्यवाही केल्याने वाळू माफियांना चांगलाच दणका बसला असून एपीआय राजेश गडवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कारवाईचे कौतुक चकलांबा ग्रामस्थांकडून होत आहे

# गेवराई तालुक्यात कुशल बील खात्यात वर्ग झालेल्या लाभार्थ्यांचा स्थळ पाहणी अहवाल सादर करण्याचे गटविकास अधिकारी चे आदेश

## 228 लाभार्थ्यांच्या शेतात जाऊन पाहणी करण्यासाठी दहा पथकाची स्थापना

चकलांबा -प्रतिनिधी असलम सय्यद महात्मा गांधी रोजगार हमी योजने मधून गेवराई तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत अंतर्गत लाभार्थ्यांनी मोहगनी वृक्ष लागवडीचे प्रस्ताव पंचायत समिती कार्यालय येथे सादर केले यामध्ये काही लाभार्थ्यांनी स्वतः प्रस्ताव दाखल केले तर अनेक ठिकाणच्या गावातून रोजगार सेवक,गाव पुढारी,यांच्या मार्फत प्रस्ताव दाखल केले या प्रस्तावाचे मंजुरी नंतर काही मस्टर काढून डायरेक्ट कुशल बील प्रस्तावित केले आणि ते लाभार्थ्यांच्या खात्यात ऑनलाइन जमा करण्यात आले परंतु तालुक्यात अनेक ठिकाणी कामेच झाली नसून कुशल बील काढण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी याची स्थळ पाहणी करण्याच्या सूचना दिल्या असून तपासणी पथके तयार करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.त्यामुळे आता महात्मा गांधी रोजगार हमी योजनेमध्ये लाखोचा घोटाळा उघड होईल अशी चर्चा तालुक्यात होत आहे.

गेवराई पंचायत समिती मागील अनेक दिवसापासून एक ना अनेक कामामुळे जिल्ह्यात चर्चेचा विषय बनली असून मागील काळात तालुक्यातील धोंडराई,तलवाडा यासारख्या मोठ्या ग्रामपंचायत सह अनेक ग्रामपंचायत मध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे कामे बोगस कामे झाले असल्याचे उघड झाले होते परंतु त्यावेळी मोठी कारवाई करण्यात आली नाही,परंतु आता तालुक्यातील मोहगणी वृक्ष लागवडीच्या कुशल बीलाचे प्रकरण समोर आले असून कुशल बेलाची रक्कम पंधरा दिवसापूर्वी लाभार्थ्यांच्या खात्यात ऑनलाइन जमा झाली असून काही लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणे बाकी आहे.परंतु अनेक ठिकाणी मोहगणी वृक्ष लागवडच झाली नसल्याने पैसे खात्यात कसे काय जमा केले,प्रस्ताव कोणी तयार केले,हा संशयित प्रश्न उपस्थित होत आहे.त्यामुळे गटविकास अधिकारी यांनी तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या अंतर्गत गाव निहाय वृक्ष लागवड झाली की नाही हे शेतात जाऊन स्थळ पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत त्याच बरोबर या संबंधीचे सर्व अभिलेखे,रेकॉर्ड उपलब्ध करून तत्काळ अहवाल पंचायत समिती कार्यालयात सादर करण्याच्या सूचना पथक प्रमुख यांना दिल्या असल्याने आता हे पथक कधी पाहणीसाठी गावात येऊन शेतात पाहणी करतात हे पहावे लागेल.

# कांदिवली मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव 2025 च्या पूर्व तयारीची संयुक्त बैठक झाली संपन्न

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. कांदिवली मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव २०२५ च्या पूर्व तयारीची संयुक्त बैठक नुकतीच पार पडली.मंगळवार दिनांक १२ आगस्ट २०२५ रोजी सकाळी ११वाजता मुंबई महानगर पालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय आर दक्षिण विभाग कांदिवली येथील पहिल्या मजल्यावरील सभागृहात सदर बैठक पार पडली, या मध्ये सहाय्यक आयुक्त मनिष साळवे, गणेशोत्सव समन्वय समिती सदस्य, विभागातील गणेश उत्सव मंडळाचे पदाधिकारी, पोलीस अधिकारी, वाहतूक पोलीस अधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी,मनपा सर्व विभागातील कार्यकारी अभियंता,यांचा समावेश होता, या वेळी सहाय्यक आयुक्त मनिष साळवे यांनी सांगितले की," गणेश उत्सव साजरा करताना अडचणी आल्यास त्या समन्वय समिती सदस्य, गणेश मंडळ यांच्या प्रयत्नातून दूर



केल्या जातील," यावेळी गणेश उत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या समस्या सांगितल्या,त्यावर शिवसेना नेते विनोद घोसाळकर, सहाय्यक आयुक्त मनिष साळवे यांनी मार्गदर्शन केले, मनपा व पोलीस परवाना घेणे बंधनकारक आहे, गणेश मूर्ती ची उंची मर्यादित असावी, गणेश मूर्ती ची उंची अर्जात नोंद करावी, ध्वनी प्रदुषण बाबत मंडळाने नियमाचे पालन करावे, सांस्कृतिक कार्यक्रमा बरोबरच आरोग्य,



रक्त दान शिबिर, पथनाट्य, सामाजिक संदेश देणारे फलक, शासकीय योजनांचा लोकांपर्यंत प्रसार करावा, मंडपाच्या जवळ पास दुकाने नसावीत, निर्माल्याचे वर्गीकरण करावे, घरगुती गणेशमूर्ती ४ फुटांपर्यंत असावी, शक्यतो घरातील धातूच्या मूर्तीचै पूजन करावे, सार्वजनिक गणेशोत्सवाच्या ६ फुटांपेक्षा जास्त उंचीच्या गणेश मूर्ती चे विसर्जन नैसर्गिक तलावात करावे, आणि ६ फुटांपेक्षा कमी उंचीच्या गणेश मूर्ती चे विसर्जन कृत्रिम तलाव मध्ये करावे.वाहतूक पोलीस, पोलीस, मनपा अधिकारी यांच्या सूचनेचे पालन करावे, कांदिवली येथे १६ ठिकाणी कृत्रिम तलाव आणि ३ नैसर्गिक तलाव विसर्जन साठी आहेत, आदी विषयांवर या बैठकीत सामुहिक रितीने चर्चा पार पडली, शिवसेना विभागप्रमुख संतोष राणे यांनी यावेळी कांदिवली विसर्जन तलाव, रस्ता, या समस्या मनपा ने सोडवाव्यात आणि गणेश मंडळाच्या समस्याशी आम्ही सहमत आहोत,असे सांगितले, या बैठकीत सहाय्यक आयुक्त मनिष साळवे, शिवसेना नेते विनोद घोसाळकर, विभाग प्रमुख संतोष राणे, शाखा प्रमुख, पोलीस अधिकारी, वाहतूक पोलीस अधिकारी, अग्निशमन दलाचे अधिकारी, या विभागातील पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके, कांदिवली गावठाण तलावाचे नरेंद्र मुन्वाचार्य, गणेश मंडळाचे पदाधिकारी, मनपा अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# देव, देश आणि धर्मासाठी जीवन समर्पण करणाऱ्या राष्ट्रमाता म्हणजेच अहिल्यादेवी होळकर –बालमुकुंदजी पांडे

माजलगाव-प्रतिनिधीदिनांक12/08/2025 देव, देश आणि धर्मासाठी जीवन समर्पण करणाऱ्या राष्ट्रमाता म्हणजेच अहिल्यादेवी होळकर होय असे प्रतिपादन अखिल भारतीय इतिहास संकलन योजना संघटन कार्यवाह बालमुकुंदजी पांडे यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात इतिहास संकलन संस्था (देवगिरी प्रांत ) द्वारा आयोजित तिसऱ्या प्रांतीय अधिवेशनात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, तसेच मंचावर केंद्रीयवकार्यवाह डॉ .हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक तथा केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड, केंद्रिय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, विद्या सभा उपाध्यक्ष उमेश जगताप, श्रीरंग गोसावी (पालक इतिहास संकलन समिती देवगिरी प्रांत ), डॉ. व्यंकटेश लांब (व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर ), डॉ. राधाकृष्ण जोशी (केंद्रीय कार्यवाह पश्चिम प्रांत ), महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे उपस्थित होते. पुढे बोलताना बालमुकुंद पांडे म्हणाले की, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महिला सक्षमीकरणाचे कार्य प्रभावीपणे केले. देशाची स्वाभिमानता वाढविण्यासाठी त्यांचे योगदान महत्वाचे ठरते. सोरटी सोमनाथ येथे त्यांनी शिवलिंगाची स्थापना करून संपूर्ण भारतभर अनेक शिवमंदिरे निर्माण केली. त्यांचे क्षेत्र जरी मध्य प्रदेश मालवा प्रांत हे असेल तरी त्यांनी पूर्ण भारतभर तसेच नेपाळमध्ये देखील मंदिरांचा जीर्णोद्धार केला. परंतु आपल्या इतिहासातमध्ये दुर्दैव हे आहे की या मागील काही कित्येक पिढ्यांना मुघलांचा इतिहास अभ्यासावा लागला. म्हणून ही वैभवशाली परंपरा जर जतन करायची असेल तर अहिल्यादेवी चा इतिहास पुन्हा एकदा वाचकांसमोर आणण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी राधाकृष्णजी जोशी, श्रीरंगी जोशी, केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे, विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर चे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्यंकटेश लांब, केंद्रीय कार्यवाह डॉ. हेमंत जी वैद्य यांनी समायोजित मनोगत व्यक्त करून या परिषदेस शुभेच्छा दिल्या. या परिषदेच्या उद्धाटन सत्राचा अध्यक्षीय समोरोप करताना केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर म्हणाले की, इतिहासाचे विकृतीकरण हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर





काळात देखील करण्यात आले परंतु आता खऱ्या अर्थाने आपणास सजग होऊन एक नवा इतिहास लिहिण्याची व वाचकांसमोर आणण्याची गरज आहे आणि आपण सर्व संशोधक तो विद्यार्थीसमोर आणताल अशी आशाही त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली. अशा राष्ट्रीय परिषदांमधून समाजासमोर योग्य इतिहास पोहोचवण्याची जबाबदारी आपल्या सर्व संशोधक मार्गदर्शकाची राहील असा आशावाद ही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.



या राष्ट्रीय परिषदेमध्ये सु. ग. जोशी (लातूर) यांना बाबासाहेब आपटे ज्येष्ठ इतिहास संशोधक पुरस्कार, डॉ. प्रभाकर देव (नांदेड) स्वर्गीय मोरोपंत पिंगळे शैक्षणिक कार्य पुरस्कार, प्रा. डॉ. राजेंद्र ननवरे (जळगाव) यांना स्वर्गीय हरिभाऊ वाकणकर शिक्षक पुरस्कार, श्री. हेमंत पोखरणा (कडा जिल्हा बीड) यांना स्वर्गीय डॉ. सतीश मित्तल संघटन पुरस्कार, मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले. याप्रसंगी त्यांनी या परिषदेची ऐतिहासिक पार्श्वभूमी तसेच परिषदेचा आजपर्यंत केलेल्या कार्याचा उल्लेख करून ही परिषद समाजासाठी कशाप्रकारे कार्यरत आहे व त्यांची ध्येय आणि उद्दिष्ट काय आहेत हे विशद केले. कार्यक्रमाची सुरुवात श्री. चैतन्य आहेर यांनी वैयक्तिक पद्यांनी केली. या उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ.रमेश गटकळ यांनी केले तर आभार डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी मानले. या कार्यक्रमास स्थानिक कार्यवाह एडवोकेट विश्वास जोशी, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, महाविद्यालय अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव, तसेच महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य व स्थानिक पदाधिकारी तसेच प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बुधवार १३ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# वैद्यनाथ बँकेवर ना. पंकजाताई मुंडेंचं वर्चस्व कायम

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्वच उमेदवारांचा दणदणीत विजय



परळी /राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे वैद्यनाथ अर्बन बँकेवर वर्चस्व कायम राहिले आहे. ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मु ंडे यांच्या नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे सर्वच्या सर्व म्हणजे तेराही उमदेवार मोठया मताधिक्याने निवडून आले आहेत. या निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचा दारूण पराभव झाला. वैद्यनाथ बँक संचालक मंडळाच्या १७ जागांसाठी निवडणूक झाली. या निवडणुकीत ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल रिंगणात उतरले होते. या पॅनलच्या चार जागा या अगोदरच बिनविरोध निवडून आल्या आहेत, त्यात माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे, अनिल तांदळे, डॉ विनोद जगतकर आणि माधुरी मेनकुदळे यांचा समावेश होता. संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी परळीपासून मुंबईपर्यंतच्या ३६ मतदान केंद्रावर शनिवारी मतदान पार पडले. एकूण ४३ हजार ९६२ मतदारसंख्येपैकी १६ हजार २८७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला, एकूण मतदानाची टक्केवारी ३७.५ इतकी नोंदवली गेली होती.

### हे आहेत विजयी उमेदवार

बीड येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडली. दुपारी सर्व तेरा जागांचे निकाल हाती आले, यात लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार मोठया मताधिक्याने निवडून आले. विजयी उमेदवार पुढील प्रमाणे - विनोद सामत, प्रकाश जोशी, डॉ राजाराम मुंडे, संदीप लाहोटी, प्रवीण देशपांडे, महेश्वर निर्मळे, विजय वाककेर, अमोल डुबे, कुलभूषण जैन, राजेंद्र लोमटे, सुशांत लोमटे, मनमोहन कलंत्री, रमेश कराड

# भवर यांना आरोग्यसेवा पुरस्कार



नासिक देवळाली कॅम्प कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सफाई कर्मचारी श्री.संजय विष्णू भवर यांना मिलिटरी स्टेशन हेड कॉटर येथील वरिष्ठ अधिकारी श्री.मनिष घोडके साहेबाच्या हस्ते आरोग्य सेवा चषक , प्रमाणपत्र पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले.कारण भवर कामाला लागल्या पासून आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत सध्या ते मिलिटरी हेड कॉटर विभागात काम करीत आहे त्यांना आतापर्यंत खूप चांगल्या प्रकारे साफ सफाईचे काम वेळेवर व चांगल्या प्रकारे केले जाते म्हणून त्यांना आरोग्य सेवा पुरस्कार देण्यात आला कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या इतिहासात प्रथमच असा. पुरस्कार मिळाल्याबद्दल उप कार्यकारी अधिकारी श्री.सत्येंद्र एन.तेजाळे साहेब,रिपाईनेते व डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन श्री सुभाष पोपटराव बोराडे,कॅ.बो,ओ.एस श्री विवेक बंड साहेब,संघनक सहाय्यक श्रीनिवास सहत्र्यभोजने साहेब, बांधकाम वरिष्ठ सहाय्यक अधिकारी श्री , संतोष पवार,संजय पाठक ,फायरमेन शुभम नेहे, समाजसेवक व युवानेते भिमराव विष्णु चंद्रमोरे, यांनी आरोग्य सेवक संजय भवर यांना शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. भवर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल बौध्दाचार्य, विलास बोराडे. बोराडे,रा. कॉ,यशवंत गायकवाड ,पि.आर.पी.नेते सुनिल कटारे,रि.पा.ई दे.कॅम्प युवक अध्यक्ष रविंद्र गायकवाड,रिपाईनेते संजय जाधव, राजेश पवार, सचिन भालेराव, प्रशांत गांगुर्डे,अभीनेते महेंद्र बोराडे,जेष्ठनेते जमीलभाई सैय्यद,चेतन जाधव, रविंद्र शिरसाट सह मान्यवरांनी अभिनंदन केले.

### नोएडा दिल्लीत मुंबईचे सुपुत्र प्रमोद न सूर्यवंशी यांना 7 वा राष्ट्र गौरव प्रतिभा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.




मुंबई प्रतिनिधी समाज कल्याण फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थाने ७ वा राष्ट्रीय गौरव प्रतिभा पुरस्कार 2025 PIIT कॉलेज नोयडा दिल्लीत स्वतंत्र दिवसाच्या निमित्ताने 10 ऑगस्ट 2025 नोएडा दिल्ली येथील पुरस्काराचे आयोजन करण्यात आले .इथे मुंबईचे सुपुत्र प्रमोद न . सूर्यवंशी यांना राष्ट्र गौरव प्रतिभा सन्मान 2025 प्रदान करण्यात आला.ही संस्था अनेक समाजीज कार्य करुन ती लोकांपर्यत पोहचत आहे..या ठिकाणी 70 मान्यवर उपस्थित होते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.मान्यवर या कार्यक्रमात पाहुणे श्री.बच्चू सिंग, adm नोएडा , स्पेशल पाहुणे श्री. रवींद्र कुमार जॉइंट डायरेक्टर ppac, मिनिस्टर ऑफ पेट्रोल पंप आणि गॅस gov. इंडिया यांच्या हस्ते करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन प्रो.(डॉ.) भरत सिंह,मुख्य रक्षक, आणि डॉ. जितेन्द्र बच्चन राष्ट्रीय अध्यक्ष संस्था नोएडा दिल्ली यांनी केले होते.हा कार्यक्रम उत्तम संपन्न झाला.



बीड शहरात विविध कार्यक्रमांच्या व बैठकांसाठी आलेले भाजपचे प्रदेश महामंत्री व हिंदुत्ववादी नेते आ. संजय केणेकर साहेब यांनी आपल्या व्यस्ततेतून वेळ काढत भगिनींशी संवाद साधत रक्षाबंधन साजरा केला.यावेळी एक राखी धर्मरक्षेची याप्रमाणे लव जिहाद विरोधी कायद्याची ओवाळणी म्हणजे हिंदू भगिनींसाठी खरी धर्मरक्षणाची राखी आणि त्यांच्या सुरक्षिततेचे, सन्मानाचे व रक्षणाचे वचन असल्याचे महिलांनी आ. संजयजी केणेकर साहेब यांना हिंदू धर्म जागरण मंचाच्या महिला संयोजिका सौ. गीतांजली ताई देसाई - डोरले सांगितले.

# इंद्रायणी शिक्षण संस्थेचे ऑनलाईन कव्यसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न.

इंद्रायणी शिक्षण संस्था तांदुळवाडी आयोजित पहिले ऑनलाईन काव्यसंमेलन नुकतेच दिनांक 10.08.2025 रोजी रात्री 9 ते 10.30 वाजता पार पडले . इंद्रायणी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कवी होन सर यांच्या संकल्पनेतून हे काव्य संमेलन अतिशय उत्साहात आणि खेळी मेळीच्या वातावरणात पार पडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अमळनेर तालुका नेवासा येथील कवी ॲड.संजय माकोणे साहेब हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर प्रदेश येथील कवी कॅप्टन नरेंद्र कुमार. हे उपस्थित होते.त्याचप्रमाणे कोकणातील ज्येष्ठ कवयित्री अनिता कांबळे मॅडम,सुधीर नागले महाराज हे देखील आवर्जून या कार्यक्रमात उपस्थित होते. जवळजवळ 20 ते 22 कवींनी आपल्या कवितेतून काव्य मैफिल एक वेगळी उंची मिळवून दिली.या कार्यक्रमात नेवासा येथील कवी गोरखनाथ पवार,कवी प्रवीण गवळी ,कवी सुरेश वैरागर सर,कवी डॉ.वाहूरवाघ सर् ,कवयित्री कविताताई आढागळे पाथर्डी येथील कवी बाळासाहेब कोठुळे,कवी शेवाळे दादा,राहुरी येथील कवी मुंतोडे सर,तसेच कवी रासकर सर,होन सर,आदींनी कार्यक्रमात सहभागी होऊन बहारदार कविता सादर केल्या.समारोप संगमनेर येथील ज्येष्ठ कवी कानवडे महाराज यांच्या बहारदार कवितेने झाला.अध्यक्षीय भाषणामध्ये ॲड.संजय माकोणे यांनी सांगितले की अशा प्रकारच्या ऑनलाईन काव्यसंमेलना मुळे कविता ही साता समुद्रापार जाते व घर बसल्या बसल्या आपणाला प्रतिभावान कवींच्या कविता ऐकण्याची संधी मिळते. तसेच ते पुढे म्हणाले की अशा प्रकारचे कार्यक्रम वारंवार आयोजित करावे व नवोदित कवींना अशा कार्यक्रमात सहभागी होण्यास अमंत्रीत करावे . कवी मोहीनीराज होन सरांनी सुत्रसंचालन केले व आभार प्रदर्शन कवी गोरखनाथ पवार यांनी केले.

# इंद्रायणी शिक्षण संस्थेचे ऑनलाईन कव्यसमेलन मोठ्या उत्साहात संपन्न.




कवी निंबाजी बळीराम वाघ यांच्या शारदा प्रकाशन तर्फे प्रकाशित स्वयंदीप या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा रविवारी, १० ऑगस्ट २०२५ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, महास्थवीर चंद्रमणी बुद्ध विहार, उल्हासनगर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी विभागीय उपसंचालक प्रा. विजयकुमार गवई यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. मिनल वानखेडे उपस्थित होत्या. प्रकाशन सोहळ्यात प्रमुख वक्ते माजी प्राचार्य डॉ. व्ही. बी. तायडे, कवी प्रा शुक्राचार्य गायकवाड, लेखिका समीक्षक प्रा प्रज्ञा पंडित,भारती निंबाजी वाघ तसेच शारदा प्रकाशनचे प्रकाशक प्रा. डॉ. संतोष लक्ष्मण राणे उपस्थित होते.

“बाबासाहेबांनी दिलेल्या शक्ती आणि विचारांचे पालन केल्यास अशक्य काहीही नाही.एकमेकांना साथ दिल्यास आणि राज्यहित लक्षात घेतल्यास आपला सर्वांगीण विकास होऊ शकतो.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या प्रेरणा, ज्ञान आणि आत्मविश्वासामुळे आपण आकाशालाही गवसणी घालू शकतो असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले. कवी निंबाजी वाघ यांनीही आपल्या काव्य लेखनाचा प्रवास आपल्या मनोगतात व्यक्त केला. कार्यक्रमास साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून स्वयंदीप काव्यसंग्रहातील रचनांचे कौतुक केले व कवी निंबाजी वाघ यांना शुभेच्छा दिल्या. उपस्थित मान्यवरांमध्ये कवी भीमराव रायभोळे, कवी आकाश वानखेडे, कवी निवृत्ती बळीराम साळवे, कवी सतीश थोरात, विक्रम पवार, जीवन शिंदे, संजीव सिरसाट, शिवाजी वाघ, सुमित इंगळे, सचिन शहाणे, वैभव काळखैरे , कवी शिवा इंगोले आदींचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शांताराम निकम यांनी केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com